आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित
महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट)
प्रकल्पासाठी आर्थिक वर्ष सन २०२६-२७
करीता निधी वितरीत करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मॅग्नेट ०८२६/प्र.क्र.१७५/२१-स**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०४ जून, २०२६.

**वाचा:-**

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.कृपमं-०११८/प्र.क्र.१३/२१-स, दि.३०.०९.२०२०.
२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.योजना-१०२०/प्र.क्र.१८३/२१-स, दि.०९.१०.२०२०.
३) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.मॅग्नेट-०८२४/प्र.क्र.२४५/२१-स, दि.२१.०२.२०२५
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६
५) प्रकल्प संचालक, मॅग्नेट प्रकल्प यांचे पत्र क्र. मॅग्नेट/२०२६-२७/निधी मागणी / ७८/२०२६, दि.२२.०४.२०२६.

**प्रस्तावना:-**

आशियाई विकास बँक (ADB) अर्थसहाय्यित "महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) (Maharashtra Agribusiness Network-MAGNET)" प्रकल्प ६ वर्षासाठी राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये राबविण्यास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. मॅग्नेट प्रकल्पामध्ये राज्यात उत्पादित होणाऱ्या डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, सिताफळ, पेरु, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची (हिरवी व लाल) व फुलपीके याप्रमाणे ११ फलोत्पादन पीकांचा समावेश होता. तदनंतर संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये सदर प्रकल्पामध्ये दि.१४.४.२०२३ पासून आंबा, काजू, लिंबू व पडवळ ४ पिकांचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर प्रमुख १५ फलोत्पादन पिकांच्या मुल्यसाखळ्या विकासित करणे, मुल्यसाखळ्यांमध्ये खाजगी गुंतवणुक आकर्षित करुन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, फळे व भाजीपाल्याचे काढणी पश्चात नुकसान कमी करणे, त्यांची साठवणुक क्षमता वाढविणे, मागणीनुसार मालाची मुल्यवृध्दी करणे, वितरणक्षमता कार्यक्षम करणे आणि शेतकरी उत्पादक संस्थांचा मुल्यसाखळीतील सहभाग वाढविणे, महिला व दुर्बल घटकांचा सहभाग वाढविणे हे प्रकल्पाचे मुख्य उद्देश आहेत.

मॅग्नेट प्रकल्पासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी राज्य हिश्याकरीता रु.२७,६४,५३,०००/- व बाह्य हिस्सा रु.१२८,०७,६१,०००/- असा एकूण रु.१५५,७२,१४,०००/- निधी अर्थसंकल्पीत झालेला आहे.

सन २०२६-२७ या चालू आर्थिक वर्षासाठी मंजूर निधीपैकी वित्त विभागाने संदर्भ क्र.४ येथील परिपत्रकानुसार वार्षिक तरतुदीच्या ६० टक्केच्या मर्यादेत निधी वितरीत करण्यास दिलेल्या मान्यतेनुसार मॅग्नेट प्रकल्पासाठी राज्य हिश्याकरीता रु.१६.५९ कोटी व बाह्य हिश्याकरीता रु.७६.८४ कोटी असा एकुण रु.९३.४३ कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (MAGNET) प्रकल्पासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता राज्य हिश्याकरीता रु.१६.५९ कोटी (अक्षरी रुपये सोळा कोटी एकोणसाठ लाख फक्त) व बाह्य हिश्याकरीता रु.७६.८४कोटी (अक्षरी रुपये शाहत्तर कोटी चौऱ्याऐंशी लाख फक्त) असा एकूण रु.९३.४३कोटी (अक्षरी रुपये त्र्याण्णव कोटी त्रेचाळीस लाख फक्त) इतका निधी वितरीत करण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. आशियाई विकास बँक सहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) प्रकल्पासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पीत व वितरीत करावयाच्या निधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

(रुपये कोटीत)

| लेखाशिर्ष | राज्य/बाह्य हिस्सा | अर्थसंकल्पित निधी | वितरीत करावयाचा निधी |
|---|---|---|---|
| ४४३५ ००४८ | राज्य हिस्सा (३०%) | २७.६४५३ | १६.५९ |
| ४४३५ ००५७ | बाह्य हिस्सा (७०%) | १२८.०७६१ | ७६.८४ |
| **एकूण** | - | १५५.७२१४ | ९३.४३ |

३. महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (MAGNET) प्रकल्पासाठी होणारा खर्च खाली नमूद केलेल्या दोन लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करीता मंजूर असलेल्या अर्थसंकल्पीय निधीतून भागविण्यात यावा:-

| **राज्य हिस्सा-लेखाशिर्ष** | **बाह्य हिस्सा-लेखाशिर्ष** |
|---|---|
| मागणी क्र. व्ही -३<br>४४३५ - इतर कृषि विषयक कार्यक्रम यावरील भांडवली खर्च<br>(०१), पणन व गुणवत्ता नियंत्रण<br>(१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका<br>(००)(०१) आशियाई विकास बँक सहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) (राज्य हिस्सा ३० टक्के) (कार्यक्रम)<br>४४३५ ००४८,<br>५४-गुंतवणूका | मागणी क्र. व्ही -३<br>४४३५ - इतर कृषि विषयक कार्यक्रम यावरील भांडवली खर्च<br>(०१), पणन व गुणवत्ता नियंत्रण<br>(१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणूका<br>(००)(०२) आशियाई विकास बँक सहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) (बाह्य हिस्सा ७० टक्के) (कार्यक्रम)<br>४४३५ ००५७,<br>५४-गुंतवणूका |

४. उपरोक्त परिच्छेद क्र.२ येथील तक्त्यात नमूद केलेल्या निधीचे आहरण व वितरण करण्यासाठी श्री.विजयकुमार ल. लहाने, सह सचिव (पणन) (V००१०), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व श्री.सु.पु.पांगारकर, कार्यासन अधिकारी (रोख शाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेला निधी अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई येथून आहरीत करुन संबंधितांना वितरीत करण्याची कार्यवाही आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रक अधिकारी यांनी करावी.

५. मॅग्नेट प्रकल्पाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी RTGS सुविधेद्वारे प्रकल्पाच्या बँक खात्यावर जमा करावयाचा असून, त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| बँकेचे नाव | बँक ऑफ इंडिया, स्वारगेट शाखा, पुणे-०९ |
| खात्याचे वर्णन | MAHARASHTRA AGRIBUSINESS NETWORK-MAGNET SOCIETY |
| खाते क्रमांक | ०५०८२०११०००००८२० |
| IFSC CODE | BKID००००५०८ |

६. या शासन निर्णयाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी ज्या कारणास्तव मंजूर केलेला आहे, त्याच कारणासाठी विनियोग करण्याबाबत प्रकल्प संचालक, मॅग्नेट प्रकल्प यांनी खात्री करावी आणि यासंदर्भातील अनुपालन अहवाल व निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तत्परतेने सादर करावे.

७. प्रकल्प संचालक यांनी सदर प्रकल्पांतर्गत खर्ची पडणाऱ्या निधीची आशियाई विकास बँकेकडून सत्वर प्रतिपूर्ती मिळवावी व मिळालेल्या प्रतिपूर्तीबाबत शासनास वेळोवेळी अहवाल पाठवावा.

८. वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.०९.०४.२०२६ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार विहीत केलेल्या अटींची पूर्तता होत असल्याने, सदर परिपत्रकान्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३२०/२०२६/व्यय-२, दि.१३.०५.२०२६ व अनौ.संदर्भ क्र.३९/२०२६/ऋण व हमी, दि.०२.०६.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०६०४१५३५२१८५०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MADHAVI SANDEEP SHINDE

Digitally signed by MADHAVI SANDEEP SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=020531E249E88FE74BF6DB805F42944E7F29BC0BA6134C83C1F183B8CC27F2FF, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4CB1CBBD6A4EE442FDAA6C1B358BF61FEAF9AEFC16E8F39E9EE1D06B9E8A7A59, cn=MADHAVI SANDEEP SHINDE
Date: 2026.06.04 15:36:53 +05'30'

**(माधवी सं.शिंदे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई.

३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे.
४. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प, पुणे.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य -१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) मुंबई.
६. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य -२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) नागपूर.
७. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. कक्ष अधिकारी (व्यय-२/अर्थसंकल्प-१३/ऋण व हमी कक्ष), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. कक्ष अधिकारी (१४३१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अवर सचिव/कक्ष अधिकारी (१७-स/रोख शाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती (२१-स).